# <u>कृषि विभाग जिल्हा परिषद सांगली</u>

## <u>विस्तार अधिकारी (कृषि)</u>

जाहिरात क्रमांक-१ /कृषि /आस्था-१/कृषि अधिकारी भरती २०१२-१३
कृषि विभाग जिल्हा परिषद सांगली

दिनांक /०४/२०१३

कृषि विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांच्या आस्थापनेवरील विस्तार अधिकारी (कृषि) संवर्गाच्या रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परिक्षेसाठी (लेखी) अर्ज मागविणेत येत आहेत. उमेदवाराचे नांव जरी सेवा योजन कार्यालय, समाज कल्याण विभाग, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प,जिल्हा सैनिक कार्यालय,सहाय्यक संचालक , विदयापिठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर यांचेकडे नोंदणी केली असली तरी विहीत नमून्यातील अर्ज व शुल्क(मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सांगली यांचे नांवाचा डी.डी.) जोडणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.सोबत जोडलेल्या नमून्यातील अर्ज टंकलिखित करुन अथवा संगणकीकृत करुन दिनांक

/ ०४ /२०१३ ते / ०४ /२०१३ अखेर कृषि विभाग,जिल्हा परिषद,सांगली येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स.१० ते सायं.५.४५ या वेळेत स्विकारले जातील.

**पदाचे नांव :- विस्तार अधिकारी (कृषि) वर्ग-३ श्रेणी-२,**

**वेतनश्रेणी र.रु.९३०० - ३४८०० ग्रेड पे ४२००**

**विस्तारअधिकारी (कृषि) वर्ग-३ श्रेणी--२ रिक्त पदांचा तपशिल**

| पदाचे नांव | अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | इ.मा.व | खुला | एकूण एकंदर |
|---|---|---|---|---|---|---|
| विस्तार अधिकारी | २ पैकी १महिला | १-माजी सैनिक | १ | १प्रकल्पग्रस्त | २पैकी १महिला | ७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **(कृषि)** | **आरक्षण** | | | | | |
| **एकूण** | **२** | **१** | **१** | **१** | **२** | **७** |

**नियम व अटी :-**

१) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. पदांसाठी आवश्यक अर्हता अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांका अखेर धारण करणे आवश्यक आहे.तसेच **शैक्षणिक अर्हता** मान्यताप्राप्त विदयापिठाची कृषि विषयक पदवी (Bsc Agri) किंवा कृषिविषयक इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक परंतू कृषि विषयातील उच्च शैक्षणीक अर्हता आणि कृषिविषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पध्दतीचे व्यसायाचे ज्ञान व ग्रामीण जीवनाचा अनुभव असेल अशांना अधिक पसंत देणेत येईल. Btech (Agri Enginiering) यशवंतराव चव्हाण मुक्तपीठाकडील कृषि व्यवसाय व्यस्थापन पदविका दोन वर्ष व, Bsc ( कृषि फलोत्पादन) ६ वर्ष

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग प्रशासन-२०००/प्र क्र ५/२००१,३२, दिनांक २७/७/२००२ व अनुषांगीक सुधारीत शासन निर्णयाअन्वये उपरोक्त पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणे /वापराबाबतचे डी ओ ई ए सी सी सोयायटीच्या अधिकृत सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उतिर्ण झाल्याचे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य तंत्रिशिक्षण मंडळ यांचेकडील अधिकृत Ms-cit परिक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र त्यांच्या ि नयुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत सादर करण् आवश्यक राहिल. अन्यथ्ां त्यांची सेवा समाप्त होईल.

३) **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दिनांक / ०४ / २०१३ रोजी १८ वर्षापेक्षा कमी नसावे व खुल्या उमेदवारासाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयासाठी ३८ पेक्षा जास्त नसावे. प्रकल्पग्रस्तांना वयाची ४५ वर्षापर्यंत असावे.माजी सैनिक यांना वयोमर्यादा इतकी असावी. दिनांक १/११/०३ च्या शासन परिपत्रकानुसार शासन सेवेत असणा-या कर्मचाऱ्यासाठी ४५/५० वयोमर्यादा राहिल तथापि अशा उमेदवारांनी खातेप्रमुख मार्फत अर्ज करणे आवश्यक राहिल.

४) सदर अर्ज दिनांक / ०४ /२०१३ ते / ०४ /२०१३ अखेर पर्यंत कृषि विभाग जिल्हा परिषद सांगली येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायं.५.४५ पर्यंत कार्यालयात स्विकारले जातील.

**५)** उमेदवारांनी विहीत नमून्यातील अर्ज हे टंकलिखित करुन अथवा संगणकीकृत करुन अथवा सुवाच्च अक्षरात भरणेचा आहे.

६) उमेदवाराने विहीत नमून्यातील अर्जावर विहीत ठिकाणी एक पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व फोटोखाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी. फोटोवर सक्षम अधिका-याची स्वाक्षरी असावी (वर्ग-१/२ अधिकारी, प्राचार्य,मुख्याध्यापक यांची )तसेच एक जादा फोटो सोबत जोडणेचा आहे.

७) पदासाठी असणारी किमान अर्हता किंवा पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेणेत येणा-या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबतची माहिती जिल्हा परिषद सांगलीच्या नोटीस बोर्डावर पहाणेस मिळेल.

८) अर्जा सोबत खुला प्रवर्ग उमेदवारानी र.रु २००/- व मागासवर्गीय उमदेवारांनी र रु १००/- (रुपये शंभर) आवेदन शुल्क भरुन वरील रक्कमेचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचे नावने काढलेला राष्ट्रीयकृत बॅकेंचा डी डी अधोरेखीत केलैल्या (डीमान्ड ड्राप्ट) अर्जासोबत सादर करावायाचा आहे. सदर सेवा शुल्क हे नापरतावा राहिल.माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

९) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला, नांवात बदलाबाबत राजपत्र इ.बाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत अधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेल्या असाव्यात तसेच योग्य रक्कमेचा डी.डी असणे आवश्यक आहे.तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.तसेच सामान्य प्रशासन विभाग शा नि क्र प अ क १००५/प्र क्र ३६/०५/१६-अ दिनांक २६/८/२००५ नुसार लहान कुटुंब असलेल्या नमुन्यातील अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे .

१०) शासकिय / निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

११) एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

१२) पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेतील गुणवत्तेच्या आधारे रिक्त पदांच्या पाच पटीत परंतु उमेदवाराच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादीत राहील व सदरची यादी जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१३) लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहाणे बंधनकारक राहील.

१४) मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेले सर्व साक्षांकित प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

१५) शासन वित्त विभागाकडील दिनांक १ नोव्हेबर २००५ नुसार नव्याने नियुक्त होण-या उमेदवारांना नवीन परिभाषीक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल. मात्र सध्या आस्तीत्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व म ना से (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या आस्तीत्वात असलेल्या सेवा सर्वसाधारण भविष्य निर्वाह योजना त्यांना लागू होणार नाही.

१६) नैसर्गीक आपत्तीमूळै विहित दिनांकात लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर निवड समिती ठरवून देईल त्याप्रमाणे सोयीच्या दिवशी तशी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

१७) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रकल्प ग्रस्त असलेबाबत जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे माजी सैनिक उमेदवारांनी माजी सैनिक असलेबाबत जरुरती कागदपत्रे सादर करणेची आहेत.

१८) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यामध्ये बदल करणे, परिक्षा स्थगित करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समितीने स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. याबाबत कोणाला कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.शासन निर्णयानुसार अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून कर्मचारी उपलब्ध झालेस पदसंख्या कमी होण्याची शक्यता आहे.उमेदवार ज्या जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र व असलेस वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावेकृषि अधिकारी संर्वगाची लेखी परिक्षा दिनांक २५/३/२०१२ रोजी वेळेत होईल

१९) अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा एकूण १८० गुणांची असून त्यामध्ये मराठी १२ वी दर्जा, कृषि सबधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा या विषयांचा समावेश असेल.तसेच मुलाखतीसाठी एकूण २० गुण राहतील.

२०) निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर किंवा ि नयुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याची किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / ि नयुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल. वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक ३१/१/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ नंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांची नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू आहे.

२१) संपूर्ण भरती प्रक्रियेसंबधात देखरेख व तपासणी इत्यादीचे अधिकारी विभागीय आयुक्त यांना राहतील.

२२) निवड प्रक्रिमध्ये उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

(नेमणुक रद्द ठरिवणेत येईल)

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव, | सदस्य, | अध्यक्ष, |
| जिल्हा निवड समिती | जिल्हा निवड समिती, | जिल्हा निवड समिती, |
| तथा | तथा | तथा |
| कृषि विकास  अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, | जिल्हाधिकारी,सांगली |
| जिल्हा परिषद सांगली | जिल्हा परिषद सांगली . | |